## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांक :-१२/१२/२५

### कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.१९/१२/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

---

**मनपाचे वाहन क एमएच-०४-एएन-५४०० (मारुती स्विफ्ट मॉडेल सन २०१२) ची दुरुस्ती :- १) क्लज प्लेटची दुरुस्ती :-** जॉईट खोलुन गेअर बॉक्स बाहेर काढुन प्रेशर प्लेटचे बोल्ट खोलुन प्रेशर प्लेट,क्लज प्लेट, थ्रस्ट बेरींग बाहेर काढून फ्लाय व्हील खोलुन बाहेर काढणे, सर्व पार्ट तपासुन खराब झालेले पार्ट बाहेर काढुन त्याजागी नवीन फ्लाय व्हील १ नग, क्लच प्लेट १ नग, प्रेशर प्लेट १ नग, थ्रस्ट बेरींग १ नग क्लज सिलेन्डर अप्पर व लोअर नवीन फिट करुन क्लच ऑईल नवीन टाकणे, तसेच नटबोल्ट नवीन फिट करुन संपुर्ण क्लज प्लेटची दुरुस्ती करणे. **२) इंजिनची दुरुस्ती** :- स्पार्क प्लग नग ४ नविन फिट करणे. स्पार्क प्लगचे कॉईल सेट प्लग केबलसह नविन फिट करणे. फ्युल इंजेक्टर सेट खोलुन ओव्हरॉल करुन खराब झालेले इंजेक्टर नग १ नविन फिट करणे. **३) सीट दुरुस्ती व मॅटींग व लेमिनेशन :-** वाहनचालक यांच्या रिपोर्ट नुसार सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनाचे सर्व शीट खराब झाले आहे. तसेच मॅटींग फाटले आहे. तरी सर्व प्रथम सदर वाहनाचे जुने सिट कव्हर आणि सिट बाहर काढुन सर्व सिटचे खराब झालेले कुशन बाहेर काढुन त्याजागी नविन फोम हेवी डेनसिटचे फिटींग व बॉक्स फिटींग करुन नविन रेग्झीन कपडा लावुन शिलाई करणे तसेच नविन सिट कव्हर फिटींग करुन सर्व सिट फिट करणे. जुने मॅटींग काढुन त्याजागी नविन स्टँडर्ड कंपनीचे मॅटींग आणि कारपेटला प्लॅस्टिक लॅमिनेशन करणे **४) लाईट व हॉर्नची दुरुस्ती** :- १) खराब झालेले हॉर्न काढुन नविन हॉर्न १२VDC ०२ नग फिट करणे. २)वाहनाची संपुर्ण वायरिंग चेक करणे. ३) वायरिंग ज्या ठिकाणी कट झालेली असेल त्या ठिकाणी ती वायर कट करुन त्याच गेजची वायर फिटींग करुन दुरुस्ती करणे. ४) संपुर्ण वायर खराब झाली असून त्या ठिकाणी नविन वायर टाकून लाईट चालू करणे. ५) मागील दोन्ही साईडचे टेल लाईट फुटले असून नविन टेल लाईट बल्प सहित बसवून चालु करणे. ६) पुढील दोन्ही साईडचे खराब झालेले हेड लाईट अेस्मबली काढुन नविन हेड लाईट अेसंम्बली बल्पसहित फिट करणे. ७) मागील व पुढील दोन्ही साईडचे ईन्डीकेटर नविन फिट करणे. **५) स्टार्टर, अल्टरनेटरची दुरुस्ती :-** दुरुस्ती करीता बॅटरीचे दोन्ही वायर काढणे, स्टार्टर व अल्टरनेटर बाहेर काढणे. स्टार्टर व अल्टरनेटर डिसमेंटलिंग करुन पेट्रोल वॉश करणे. खराब झालेले पार्ट बाहेर काढुन त्याजागी नविन स्टँडर्ड कंपनीचे कार्बन ब्रश, ब्रश होल्डर, बुश, सोलोनाईट स्विच, डायवोट, डायवोट प्लेट, बेरींग नविन फिट करुन स्टार्टर व अल्टरनेटर दोन्ही फिट करणे. बॅटरी, बॅटरी टर्मिनल फिटींग करुन पुर्ण वायरिंग चेक करुन दुरुस्ती करणे. **६)दरवाजे व विंड ब्रॅकेटची दुरुस्ती** :- सर्व प्रथम चारही दरवाजाचे आतील बाजुचा पुष्ठा काढुन काच व काच लॉक व ग्लास व्हॅडिंग मशिन बाहेर काढणे. चारही दरवाजाचे जुने हॅण्डल व लॉक काढुन त्याजागी नविन स्टँडर्ड कंपनीचे हँडल व लॉक फिटींग करुन ०४ नग ग्लास वाईंडिंग मशिन व त्याचे नविन मोटार फिटींग करुन नविन लॉक पट्टी फिटींग करुन दुरुस्ती करणे.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

---

दिनांक१२/१२/२०२५
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ